जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/ ९३४९५ /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- १९/११/२०२४

**विषय :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस.) २०२३ चे कलम १६३ प्रमाणे आदेश.**

आदेश -

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे मुख्य निवडणुक अधिकारी, भारत सरकार यांचे प्रेसनोट क्र. ECI/PN/149/2024 DATE 15.10.2024 अन्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहिता दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदार संघासाठी दिनांक २०/११/२०२४ रोजी मतदान झालेले आहे.

२०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेन्ट व २१५ कसबा पेठ या विधानसभा मतदार संघांची मतमोजणी दिनांक २३/११/२०२४ रोजी पुणे शहर आयुक्तालय हद्दीत " धान्य गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे " येथे पार पडणार आहे.

स्ट्रॉंगरुम परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेसाठी स्ट्रॉंगरुमचे १०० मीटर परिसरात मोबाईल फोन व इलेक्ट्रॉनिक उपकरणे घेवुन जाणे, बेकायदेशीर जमाव जमवणे व वाहने घेवून जाणेस मनाई करणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस.) २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील धान्य गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे येथील स्ट्रॉंग रुमचे १०० मीटर परिसरात दि.२०/११/२०२४ रोजी ००.०१ वा. पासून दि.२३/११/२०२४ रोजी मतमोजणी पुर्ण होईपर्यत खालील आदेश देण्यात येत आहे.

- मोबाईल, लॅपटॉप, आयपॅड, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे तसेच मॅचबॉक्स वापरण्यास अगर घेवून येण्यास मनाई करण्यात येत आहे. **(फक्त मोबाईलबाबत कर्तव्यावर असणाऱ्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना हा आदेश लागू राहणार नाही.)**
- कोणत्याही प्रकारे फोटोग्राफी / व्हिडीओग्राफी करण्यास मनाई करण्यात येत आहे.
- शासकीय वाहने सोडून कोणत्याही प्रकारचे वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.
- पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोक एकत्र येवून बेकायदेशीर जमाव जमविणेस मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.१९/११/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- १९/११/२०२४

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर